दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक
मुख्य संपादक : अजय भांगे

● बीड/महाराष्ट्र ● रविवार दि.९ मार्च २०२५ ● आरएनआय-एमएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक-१३३ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

## महाराष्ट्रात तापमानाचा भडका उडणार?

**मुंबई**–आता देशातील हवामान बदलणार आहे. येत्या दोन दिवसांत महाराष्ट्र, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेशसह देशातील ९ राज्यांमध्ये उष्णता वेगाने वाढेल. खासगी हवामान एजन्सी स्कायमेटच्या मते, अफगाणिस्तानवर वेस्टर्न डिस्टर्बन्स सक्रिय आहे. ते ९ मार्चच्या रात्री जम्मू आणि काश्मीरला पोहोचेल. महाराष्ट्रात उत्तरेऐवजी पूर्वेकडून वारे वाहू लागतील. यामुळे पुढील तीन-चार दिवसांत खूप उष्णता जाणवेल. १०-११ मार्च रोजी मध्य महाराष्ट्रात उष्णतेची लाट येऊ शकते, असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.हवामान एजन्सीच्या मते, यानंतरही सलग दोन-तीन पश्चिमी डिस्टर्बन्स निर्माण होतील. त्यांच्यात फरक नसल्याने, उत्तरेकडील वारे वाहू शकणार नाहीत आणि थंडी संपेल. यामुळे १५-१६ मार्चपर्यंत तापमान जास्त राहील. दरम्यान, रात्रीचे तापमानही वाढेल आणि सकाळ आणि रात्रीची थंडी संपेल. पश्चिमी विक्षोभामुळे बहुतेक डोंगराळ भागातील राज्यांवर परिणाम होईल.

## आम्ही धनंजय मुंडेंचा राजीनामा मानत नाही

# कारण मुख्यमंत्र्यांनी सभागृहात माहिती देणे अपेक्षित होते,पण तसे झाले नाही-जयंत पाटील

**मुंबई (वृत्तसंस्था)**-धनंजय मुंडे यांचा राजीनामा झाला, असे आम्ही मानत नसल्याचे राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी म्हटले आहे. कारण मुख्यमंत्र्यांनी सभागृहात याबाबत माहिती देणे अपेक्षित होते, मात्र ५ दिवस होऊनही ते याबाबत सभागृहात काही बोलले नाहीत, असे जयंत पाटील म्हणाले. याशिवाय त्यांनी राज्यातील कायदा व सुव्यवस्थेवरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांवर निशाणा साधला.

जयंत पाटील यांनी पुन्हा एकदा राज्यातील कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्नावरून मुख्यमंत्री देवेंद्र फडवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. पोलिसांना हाताशी धरून रोज गुन्हे करण्याची नवीन पद्धत सुरू झाली असल्याचा आरोप जयंत पाटील यांनी केला आहे. यावेळी त्यांनी मंत्री जयकुमार गोरे यांनी पाठलेल्या हक्कभंग नोटीसीवरही प्रतिक्रिया दिली.धनंजय मुंडेंचा राजीनामा झाला, असे आम्ही मानत नसल्याचे म्हणाले. धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याबाबत सभागृहात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माहिती देणे अपेक्षित होते, मात्र पाच दिवस झाले त्यांनी अजूनही त्यावर वक्तव्य केले नाही. त्यामुळे हा राजीनामा झाला असे आम्ही मानत नाही, असे जयंत पाटील म्हणाले. पोलिसांना धागेदोरे सापडले तर ते धनंजय मुंडेंवर देखील गुन्हा दाखल करू शकतात. मला माहित नाही की पोलिसांजवळ काय माहिती आहे, असेही ते म्हणालेत.पोलिसांना हाताशी धरून रोज गुन्हे करण्याची नवीन पद्धत सुरू झाली आहे, पोलिसांना गुन्हा होण्याच्या आधीच माहिती असते हे मी अनेक ठिकाणी ऐकले आहे. राज्यात कायदा व सुव्यवस्थेची अतिशय वाईट परिस्थिती आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे या दोघांमध्ये कदाचित शीतयुद्ध चालू असल्याचे दिसते, असं जयंत पाटील यांनी म्हटलं आहे.मंत्री जयकुमार गोरे यांनी सभागृहात हक्क भंग मांडल्यामुळे राज्याला याची माहिती झाली, नाही तर फक्त मीडिया पुरतीच ही माहिती राहिली असती. मात्र त्यांनी स्वतःहून ही माहिती सभागृहाला दिली. आता हे प्रकरण हक्कभंग समितीकडे जाईल आणि हक्क भंग समिती निर्णय घेईल. परंतु सभागृहाबाहेर बोललेली ही गोष्ट आहे. त्यामुळे संजय राऊत यांच्यावर हक्क भंग लागू होईल, असे वाटत नाही. महाविकास आघाडीच्या बैठकीत जयकुमार गोरे यांच्या राजीनाम्याबाबत ठरेल, असे जयंत पाटील म्हणाले.



## रामचंद्र म्हात्रे विद्यालयात चष्मा वाटप शिबीर व राष्ट्रीय महिला दिन संपन्न





**पनवेल । प्रतिनिधी**

ज्ञान प्रसारक शिक्षण संस्थेचे संस्थापक शिक्षकमित्र प्राचार्य बाळासाहेब म्हात्रे यांच्या स्मृती दिनानिमित्त २१ जानेवारी २०२५ रोजी रामचंद्र म्हात्रे विद्यालय ॲन्ड ज्युनियर कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स ॲन्ड कॉमर्स येथे आर. झुनझुनवाला आय हॉस्पिटल पनवेल यांच्या सहकार्याने आयोजित केलेल्या मोफत नेत्र चिकित्सा शिबिर आयोजित करण्यात आले होते. यावेळी ७२५ विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली. ज्या विद्यार्थ्यांमध्ये नेत्र दोष आढळला त्यांना ८ मार्च या राष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून मोफत चष्मा वाटप करण्यात आले.

मोफत चष्मा वाटप आणि राष्ट्रीय महिला दिनानिमित्त कार्यकामासाठी उपस्थित असलेल्या सर्व महिला मान्यवर, शाळेतील सर्व शिक्षिका व शिक्षकेत्तर महिला यांचा भेटवस्तू व गुलाब पुष्प देवून सन्मान करण्यात आला. यावेळी इयत्ता सहावी मधील विद्यार्थीनी माही भोसले हिने महिला दिनावर आधारित स्वरचित कविता सादर केली. यावेळी आवरे ग्रुप ग्रामपंचायतीच्या सरपंच श्रीमती निराताई पाटील, श्रेया ॲकॅडमीच्या अध्यक्षा सौ. स्मिता म्हात्रे, सौ. राजश्री गावंड, आर. झुनझुनवाला आय हॉस्पिटलच्या सौ. ज्योती पाटील, प्राचार्य सुभाष ठाकूर, सर्व महिला शिक्षिका व सर्व महिला शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थीनी उपास्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शेखर म्हात्रे तर आभार प्रदर्शन राजेंद्र शिंदे यांनी केले.

## कव्हे ता. माढा येथे ग्रामस्थांसाठी छावा चित्रपट प्रदर्शित करण्यात आला



**सोलापूर । विश्वास चोपडे**

कव्हे ता.माढा येथे शनिवार दिनांक ०८/०३/२०२५ रोजी महिला दिनाचे औचित्य साधून कव्हे ग्रामस्थांच्या वतीने छावा चित्रपट प्रदर्शित करण्यात आला. पूर्वीच्या काळी ग्रामीण भागात मनोरंजनासाठी पडद्यावर चित्रपट दाखवले जायचे. तेही गणपतीच्या वेळी पाहावयास मिळत असे त्यानंतर घरोघरी टीव्ही आले व आता मोबाईल आले त्यामुळे लोक एकत्र न येता दुरावले गेले परंतु खूप दिवसांनी लहान मुले गावांमधील तरुण वयोवृद्ध एकत्र येऊन छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावरील छावा चित्रपट हा पाहिला.कव्हे गावातील ग्रामस्थ चित्रपट पाहण्यासाठी एकत्र आले. महिला व लहान मुलांनी चित्रपट पाहिल्याने इतिहासाची माहिती त्यांना मिळाली.

## जीवाची वाडी येथील अंगणवाडीत जागतिक महिला दिन उत्साहत साजरा



**येवता । प्रतिनिधी**

दि.८ मार्च २०२५ रोजी.केज तालुक्यातील जीवाची वाडी येथील अंगणवाडीत जागतिक महिला दिन साजरा करण्याचे आयोजन बाल विकास प्रकल्प कार्यालय, केजच्या बाल विकाश प्रकल्प अधिकारी,श्रीमती शोभाताई लटपटे,यांच्या आदेशावरून व प्रकल्प येवता विभागाच्या प्रविक्षिका श्रीमती काशीबाई घाडगे त्यांच्या मार्गदर्शनाखाली जीवाची वाडी अंगणवाडी येथे जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला प्रथमता देवी माता विधीचे माहेरघर क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या शुभहस्ते करून कार्यक्रमास सुरुवात झाली या कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रकल्प येवता विभागाच्या प्रवेक्षिका श्रीमती काशीबाई घाडगे यांनी प्रमुख मार्गदर्शन करताना महिला हक्क चळवळीतील केंद्रबिंदू म्हणून ८- मार्च हा जागाती क माहिला दिवस साजरा केला जातो,लिंग समानता,पुनरुपादक हक्क,सार्वत्रिक महिला मताधिकार म्हणून महिलांच्या विविध कार्यावर प्रकाश टाकण्यात आला कार्यक्रमास अंगणवाडी सेविका,मदतनीस व गावातील महिला आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रांजणी येथे जागतिक महिला दिन साजरा




**जालना (असलम कुरेशी):**घनसावंगी तालुक्यातील रांजणी येथील अंगणवाडी केंद्रात शनिवारी जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपसरपंच शेख रहीम हे तर प्रमुख पाहुणे म्हणून मत्स्योदरी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ मदीना शेख, सेवानिवृत्त मुख्याध्यापक विजयकुमार खुळे, संजय मांडवे, रजनी देशपांडे, वैशाली वनगुजरे आदी उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वंदना कपाळे यांनी केले. प्रास्ताविक रजनीबाई देशपांडे यांनी केले. यावेळी प्रमुख पाहुण्यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास प्रिया मांडवे, वंदना कपाळे, मसरत काझी, छाया हलगे, रजनी देशपांडे, पद्मछाया वनगुजरे, निर्मला देशपांडे, अर्चना चव्हाण, लता वरखडे, पूजा ठाकूर, राधा जाधव, अनुसया शिंदे, शबाना काझी यांच्यासह गावातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. आभार प्रिया मांडवे यांनी मानले.



दैनिक वादळ वार्ताचे संपादक अजय भांगे यांच्या आईसाहेब सौ सिताबाई महादेव भांगे यांना जागतिक महिला दिनानिमित्त सत्कार करताना मान्यवर सौ रत्नमाला शिवदास मुंडे ताई व छावा जिल्हाध्यक्ष ठोंबरे साहेब तसेच ड. मुंडे मॅडम सह मान्यवर सत्कार करताना.

## आधार व्यसनमुक्ती केंद्रामधे जागतिक महीला दिन साजरा



**बीड । प्रतिनिधी**

दि.०८ मार्च २०२५ रोजी आधार व्यसनमुक्ती केंद्रामधे जागतिक महीला दिन वेगळ्या उपक्रमाने उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी केंद्र संचालक तेजसनाना घुमरे, डॉ. रमाताई गिरी, संतोषजी गर्जे व बाजीराव ढाकणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या अनोख्या कार्यक्रमात जिल्हा रूग्णालय बीड येथील विवीध विभागाच्या प्रमुख रणरागिणींचा सत्कार करण्यात आला. यामधे डॉ.रमाताई गिरी (नर्सिंग सुपरीटेंडेंट) शकुंतला सुतार (लेबर होम इनचार्ज) शारदा डहाळे ( नर्सेस हॉस्टेल इनचार्ज) द्वारका खाडे (सोनोग्राफी सेंटर इनचार्ज) शिला कुलकर्णी (खउण इनचार्ज) विद्या गायसमुद्रे (डायलिसीस इनचार्ज) रेखा गोतावळे (मेल सर्जिकल इनचार्ज) पुजा ठोंबरे (केंद्र परीचारीका) गौरी घुमरे यांच्या अतुलनिय कार्याबद्धल जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी तेजसनाना यांनी सत्कारमुर्ती रणरागिणी, केंद्रातील सर्व कर्मचारी व रूग्णांना मार्गदर्शन केले. यावेळी सत्कारमुर्ती रणरागीणी या सेवाभावी वृत्तीने रूग्णासोबत कसलाही भेदभाव न करता सेवा देतात तसेच रूग्णांना शारिरीक व मानसिक दोन्ही दृष्टीने सशक्त बनवतात म्हणुन तुमच्या सेवेपुढे आजच्या जागतिक महिला दिनी नतमस्तक होतो असे म्हणाले. यावेळी सत्कारमुर्तींनीही मार्गदर्शन केले. यात प्रामुख्याने डॉ.रमाताई गिरी या बोलताना म्हणाल्या की व्यसन ही समाजाला लागलेली किड आहे. व्यसनाधिन माणसामुळे कुटुंब उध्वस्त होते यामुळेच व्यसनापासुन दुर राहा. या कार्यक्रमास तेजसनाना घुमरे, संतोषजी गर्जे, बाजीराव ढाकणे केंद्र अधिक्षक श्री.संजयजी भडगळे, केंद्र समुपदेशक श्री गणेश जाधव, केंद्र परीचारीका काशिद पुजा, काळजीवाहक औदुंबर भावठाणकर आदी कर्मचारी उपस्थित होते.या कार्यक्रमाचे प्रस्ताविक गणेश जाधव सुत्रसंचालन बाजीराव ढाकणे यांनी तर आभार प्रदर्शन संजयजी भडगळे यांनी केला.

## मरियम ख़िजर काझी हिचा पहिला रोजा

**जालना । असलम कुरेशी**

परतूर शहरातील मौलाना मोहम्मद ज़ोहर प्राथमिक शाळेतील पहिली वर्गात शिकणारी विद्यार्थिनी मरियम खिज़र काझी हिने आपल्या आयुष्यातील पहिला रोजा पूर्ण केला.

कडक उन्हाळ्यात मरियम काझीने रोजा पूर्ण केल्याबद्दल तिचे सर्वत्र कौतुक होत आहे. याबद्दल तिचे शिक्षक शेख अब्दुल्ला सर, जावेद खान सर, उस्मान कुरेशी सर, रहेमत सर, साबेर सर, मुख्तार सर, शाकेर सर आदींनी तिचे अभिनंदन केले.





संपादकीय

# बथ्थडयुगाचे कोरडेपण



केंद्रातील मोदी सरकारला दहा वर्षे झाली. या काळात महाराष्ट्रात चार सरकारे आली. काही तासांच्या सरकारसहित चारही सरकारांमध्ये आलटून पालटून तेच पक्ष, तीच माणसे आहेत. केंद्रातले राज्यकर्ते आणि राज्यातले त्यांचे भाऊबंद अहोरात्र लंबाचवड्या गप्पा मारत असतात. मात्र, महाराष्ट्राच्या पाचवीला पूजलेला दुष्काळ काही हटायला तयार नाही. निवडणुकीचा एक टप्पा बाकी असला तरी महाराष्ट्रातील मतदान संपले आहे. या प्रचारात सर्व पक्षांच्या केंद्रीय किंवा राज्य पातळीवरील किती नेत्यांनी भाषणांमध्ये, मुलाखतींमध्ये, चर्चांच्या कार्यक्रमांमध्ये पाण्याचा आणि व्यापक अंगाने शेती व शेतकऱ्यांच्या हिताचा मुद्दा लावून धरला? आज २५ जिल्ह्यांत पाण्याचे दुर्भिक्ष्य आहे. ३६ पैकी २५ जिल्हे म्हणजे तीन चतुर्थांश राज्य होरपळते आहे. मात्र, याचे कितपत गांभीर्य प्रचारखोर पक्ष, त्यांचे कार्यकर्ते, नोकरशाही आणि एकूणच समाजाला आहे? राज्यात गावे, वाड्या, वस्त्या मिळून ४२ हजार 'वसतिस्थाने' असतील. यातल्या साडेदहा हजारांहून अधिक गावे-वाड्या-वस्त्यांसाठी आज टँकर धावत आहेत. म्हणजे, राज्यातल्या एकूण वस्त्यांपैकी २५ टक्के असे प्रमाण पडते. इथेही रोज टँकर येत नाहीच. राज्यात जे तीन-साडेतीन हजार टँकर धावत असतील; ते आपल्या गावात कधी येतात, याची लक्षावधी गावकरी चातकासारखे वाट पाहात बसतात. एकदा तो आला की, भांडणे, कटकटी, पाण्याची नासाडी, आपलीच भांडी भरण्याची स्पर्धा आणि कधी कधी तर कोरड्या विहिरीत रिकामे होणारे टँकर. निवडणुकीचा प्रचार चालू असताना कार्यकर्ते आणि नागरिकांनी पाणी पिऊन फेकून दिलेल्या हजारो बाटल्यांचे फोटो येत होते. या दोन्ही चित्रांमधली विसंगती, त्यातून होणारी आपली फसगत आणि मूळ समस्यांशी तुटलेले आपले नाते लक्षात येते.

मोदी यांचा दुसरा कार्यकाळ जून २०१९ मध्ये सुरू झाला. त्या सरकारने जो पूर्ण अर्थसंकल्प मांडला, त्यात 'हर घर जल' अशी योजना जाहीर करण्यात आली होती. कोणतीही योजना जाहीर करताना ती पुरी करण्याची कालमर्यादा ठरविण्याचा मोदी यांचा आग्रह असतो! त्यानुसार हे काम पाच वर्षांत पुरे करायचे होते. आता पुढच्या निवडणुका होऊन नवे सरकार येण्याची वेळ झाली. पाच वर्षांत 'हर घर जल' पोहोचले असते तर आज महाराष्ट्रात लाखो बायामुलांना वणवण करायला लागली असती का? महाराष्ट्रात देशातल्या दुसऱ्या क्रमांकाच्या नळजोडण्या देण्यात आल्या. पण त्या नळांमधून जर पाणीच येणार नसेल तर काय करायचे? राज्यात सन २०१४ मध्ये दुसरे भाजप-शिवसेना युतीचे सरकार आले. त्या देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने 'जलयुक्त शिवार' हा कार्यक्रम हाती घेतला. राज्यातली सगळी शिवारे जर त्यानंतर एव्हाना जलयुक्त झाली असती तर त्यातले चार-दोन टक्के पाणीही पिण्यासाठी लागले नसते. मग टँकर लागले असते का? आज कुठे आहेत ती जलयुक्त शिवारे आणि जलतृप्त कोट्यवधी कुटुंबे? राज्यात सगळ्या धरणांमध्ये मिळून सरासरी वीस टक्केही पाणीसाठा नसेल. सगळ्या शहरांमध्येही जी पाणीकपात सुरू झाली आहे, ती यामुळेच. काही मोठ्या धरणांत पाणी असले तरी धरणांसहित हजारो जलाशय कोरडेठाक पडले आहेत. राज्यात मोठी, मध्यम, लहान मिळून दोन हजार धरणे आहेत. ती आज राज्यातला दुष्काळ निवारू शकत नाहीत.यंदाचा उन्हाळा महाकडक आहे, असे एक कारण दिले जाते. त्यामुळे, बाष्पीभवनाचा वेग वाढतो. हे खरे असले तरी निसर्ग गेले दशकभर असाच भ्रमिष्टासारखा वागत आहे. माणसानेच त्याला तसे बनविले आहे. त्याचे हे वर्तन लक्षात ठेवूनच आखणी करायला हवी. महाराष्ट्राचे जलधोरण मूळ विषयालाच हात घालायला तयार नाही. तो म्हणजे, कृषी, कारखानदारी आणि घरगुती वापरासाठी १२ महिने पाणी कसे उपलब्ध करायचे, उपलब्ध पाण्याचा फेरवापर कसा करायचा आणि पाण्याचा प्रत्येक थेंब काटकसरीने कसा वापरायचा? 'पर ड्रॉप, मोअर क्रॉप..' अशा घोषणा लाल किल्ल्यावरून किंवा इतरत्र ऐकायला गोड वाटल्या तरी 'कालचा पाऊस आमच्या गावात आलाच नाही; सदरहू पीक आम्ही आसवांवर काढले आहे..' हीच अवस्था आजही आहे. यशवंत मनोहर यांची ही कविता सांकेतिक असली तरी तिचा शब्दार्थ अनेक दशके खरा होत राहावा, हे महाराष्ट्राचे दुर्दैव आहे. जे नेते आज सरकारवर टीका करीत आहेत, ते सत्तेत असतानाही हीच रडकथा होती आणि जे सत्तेत आहेत, त्यांनाही नवी धाडसी वाट चालायची नाहीये. खेडोपाडी पाण्यासाठी वणवण फिरणारी बायामुलेमाणसे टाचा घासून मरण पावली तरी समाजमनावर ओरखडाही उठू नये; इतका बथ्थडयुगाचा अंमल आता वेगाने बसतो आहे. बोलघेवड्यांचे आवाज कर्कश्श होणे आणि तोंडाला कोरड पडलेल्यांचे आक्रंदन मुके होत जाणे, हाही दुष्काळच असतो.

# आता कसं वाटतंय झाडाचे लबाड माणसाला पत्र

मी ऐकले दिवस मावळला तरी तळपत म्हणे अंधार पडलेला असतो लाही मात्र कायम असते सुर्य डुबतो उष्णता नाही एसीतून बाहेर पडले की कढाईत ढकलेल्या सारखे होते बागायती टोपी खाली ओल झालेलं डोस्क उष्माघाताने कोलाहल होतो लेकरांना बाहेर नेण्याचा लाग नाही झाडाच्या खाली तर आता माणसे कमी आणि गाड्या जास्त लावलेल्या असतात ४२ प्लस मध्ये तुम्ही तळून निघाताय हे काय मला तरी बरं दिसत का माझ्या कुळा मुळाची ह्यात मानवाची सेवा करण्यात गेली माझ्या डोक्यावर ऊन घेऊन तुम्हाला सावली देण्यात माझ्या पिढ्या सरल्या मात्र तुम्ही मला काय दिले अरे राजावी मला तोडले नाही तुमचे तुमच्या पायावर कुऱ्हाड मारुन घेतली मी फुले द्यायची फळे द्यायची उन्हात सावली द्यायची अन् तुम्ही काय कुऱ्हाड एवढे तर परोपरकारी तुम्ही माझा स्वार्थ कधीच नव्हता वसुंधरा अन् मी माय लेकरे आईच्या उदरात आमचा जन्मच तुमची सेवा करायला मोबदला आम्हाला नकोच आहे मात्र किमान तुमच्या अस्तित्वासाठी माझे अस्तित्व तुम्ही जपले पाहिजे राजा हो तुमच्या सरकारने ३३ टक्के वन करायची घोषणा केली किती टक्के आहे दोन तीन चार पाच किती टक्के ही जी उष्णता आहे ना ही केवळ तुम्ही ओढावून घेतलेली आहे आज मराठवाडा नुसता भाजतो आहे तुमच्या चुलीवरच्या तव्यावर पोट भरायला उभा केलेल्या चुली आयुष्याच्या चुलीत पाणी घालताना सिध्द होत आहेत मी एक झाड नाही तुम्हाला ऑक्सिजन देणारा तुमचा मित्र आहे राजा हो मला काय देणार आहात मला माझी जागा सोडता येत नाही तुम्ही तुमची जागा सोडू नका झाडे लावा झाडे जगवा ही घोषणा लबाड ठरते तेव्हा वाढदिवसाचं वृक्षारोपण पुढच्या वाढदिवसाला करपून गेलेले असते म्हणूनच आज कळकळीने पत्र लिहतोय तिकडे कोकणात जा आता थंडी वाजते अगदी सायंकाळी तर हुडहुडी असते आणि मराठवाड्यात ७ वाजले तर घामाच्या धारा वाटत नाही का आम्ही कुठले तरी पाप फेडत आहोत होय झाड तोडण्याचे पाप वेळेत सावरलं तर ठीक नाहीतर आवरले म्हणून समज बीडमध्ये झाडे तुटताना वृक्षतोड मोहिम राबल्याप्रमाणे ती तोडताना आपण रोजच पाहतो मात्र अत्याधुनिक यंत्रानी ज्या वेगाने झाडे तोडली जातात त्या वेगाने वृक्ष लागवड होत नाही झाली तरी ती वृक्ष लागवड फोटो शेषन पुरती मर्यादित असते नवीन महामार्ग तयार करताना रस्ता रुंदीकरण व इतर कारणांमुळे सध्या मोठ्या प्रमाणात वृक्षतोड होत आहे विकासाला आपला मुळीच विरोध नाही चांगल्या कामाचे स्वागतच आहे मात्र वृक्षतोड करण्यापूर्वी संबंधित यंत्रणावर नवे वृक्ष लागवडीची जिम्मेदारी दिली गेली पाहिजे ती कागदोपत्री दिलीही जाते मात्र प्रत्यक्षात झाडे लावली आणि वाढवली जात नाहीत मित्रांनो ही परिस्थिती बदलणे हेच आपल्या सर्व वृक्ष मित्रांचे ध्येय आहे झाडे जेवढ्या प्रामाणिकपणे तोडली जातात तेवढ्याच प्रामाणिकपणे ती लावलीही जावीत मागील दोन वर्षांपूर्वी सोलापूर धुळे या राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरी कारणासाठी औरंगाबाद ते येडशी दरम्यान एक लाखाहून अधिक झाडे तोडली झाडे तोडलेल्या जागेवर नवी झाडे लावण्याचे प्रयोजन असतानाही या रस्त्यावर अजून वृक्ष लागवड कार्यक्रम सुरू झालेला नाही वृक्ष मित्रांचा आवाज सरकारी यंत्रणापर्यंत पोचत नाही आता आपल्याला आम्ही वृक्षमित्र ही चळवळ आणखी गतिमान करावी लागेल !

**प्रशांत बाफना**

## राज्यात फक्त २३.६३ टक्के जलसाठा;भीषण जल संकट

# सरासरी तापमान ४२.५२ अंश से. पार व उन्हाचे चटके सोसवेना

उन्हाचे चटके चोहोबाजूंनी सोबतच नवतपाची झळ राज्याचा सरासरी तापमान वाढल्याने सुर्य आग ओकत आहे.उन्हाचे चटके जाणवू लागले असतानाच राज्यात लघु,मध्यम व मोठ्या प्रकल्पात केवळ २३.६३ टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे.यामुळे पाणी टंचाईच्या झळा सर्वत्रच जाणवू लागल्याने राज्यातील एकूण २५ जिल्ह्यात २ हजार ७९३ गावे आणि ७ हजार ६७१ वाड्यांमध्ये ३ हजार ६९२ टँकरने पिण्याच्या पाणीपुरवठा केला जात आहे.यामुळे यावर्षी पाणीप्रश्न अत्यंत धोका स्थितीत आहे.येत्या काळात उन्हाचा पारा वाढल्याने पाण्याची भिषण टंचाई निर्माण झाली आहे.राज्यात मागील वर्षीच्या तुलनेत यावर्षी टँकरची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे.सध्याच्या परीस्थितीत राज्यातील धरणांची स्थिती अत्यंत गंभीर व बीकट आहे अमरावती ४०.४ टक्के,कोकण ४२.१२टक्के, नागपूर ४०.४३टक्के,नाशिक ३०.६५ टक्के, पुणे २३.६९ टक्के, मराठवाडा १३.४० टक्के, संभाजीनगर ११.८९ टक्के यावरून स्पष्ट होते की पाण्याच्या बाबतीत संभाजीनगर ,मराठवाडा व पुणे अत्यंत चिंताजनक स्थितीत असल्याने तीव्रपाणी टंचाई दिसून येते.राज्यातील ७३ टक्के क्षेत्रामध्ये अकाल पडलेला आहे.यामुळे १९ जिल्हे ४० तहसीलमध्ये पाण्याची अत्यंत गंभीर समस्या निर्माण झाली आहे.कारण राज्यातील २ हजार ९९४ प्रकल्पांची एकुण क्षमता ४० हजार ४८५ दशलक्ष घनमीटर आहे.सध्या या प्रकल्पामध्ये फक्त १५ हजार १८९ दशलक्ष घनमीटर पाणी साठा उरला आहे. म्हणजेच दिवसेंदिवस पाण्याची समस्या आणखीनच बिकट होण्याची शक्यता दिसत आहे.सध्या राज्यातील १८ ते २० धरणे कोरडी पडली आहेत.त्यामुळे राज्याला तीव्र पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे.यावर्षी बदलत्या हवामानामुळे नेहमीपेक्षा कमी पाऊस झाल्याने उष्णतेच्या लाटे सोबतच पाण्याचाही हाहाःकार निर्माण झाला आहे.दरवर्षी पावसाची कृपादृष्टी असणारा पश्चिम महाराष्ट्र यंदा पाण्यासाठी तडफतो आहे. त्यामुळे आतापासूनच टँकरग्रस्त झाला आहे.पुणे विभागातील कोल्हापूर जिल्हा



वगळता पुणे, सातारा, सांगली, आणि सोलापूर या चार जिल्ह्यांतील विहिरींनी तळ गाठला आहे. यामुळे ३३४ गावातील ६ लाख ७२ हजार ८०७ नागरिकांना ३६४ टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत आहे.यावरून स्पष्ट होते की संपूर्ण महाराष्ट्रात पाण्याची टंचाई भेडसावत आहे. याचे प्रायचित्य मानव, पशुपक्षी, संपूर्ण जीवजंतू,जंगल संपदा यांना भोगावे लागत आहे.राज्यासह देशातील जलाशय साठा निम्म्यावर आलेला आहे तर दुसरीकडे सुर्य आग ओकत आहे म्हणजेच पाण्याची समस्या आणि सुर्याचे आक्राळविक्राळ रूप आणि जलसाठा कमी होने यामध्ये पृथ्वीतलावरील संपूर्ण जीवसृष्टीला यावर्षी अत्यंत कठीणायीचा सामना करावा लागतो आहे. महाराष्ट्रासह देशातील बदलत्या हवामानामुळे सर्वत्र उष्णतेची लाट तर कधी अवकाळी पाऊस व गारपीट यामुळे संपूर्ण जीवसृष्टी मानव, पशुपक्षी यांचे जीवन विस्कळीत होतांना दिसते तर दुसरीकडे वाढत्या तापमानामुळे पाण्याची समस्या दिवसेंदिवस अत्यंत बिकट होतांना दिसत आहे.विदर्भात नागपूर, यवतमाळ, अकोला, चंद्रपूर येथे उष्णतेची लाट कायम आहे तर मुंबईसह रायगड, ठाणे, पालघर येथे उकाडा वाढला आहे.म्हणजेच सुर्याने आपले उग्र रूप कळत न कळत सर्वत्र पसरविले आहे.त्यामुळे हवामान खात्याने महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांना उष्णतेच्या बाबतीत रेड अलर्ट घोषित केले आहे.अकोला ४५.६० अंश सेल्सिअस, अमरावती ४४.४ अंश सेल्सिअस, सोलापुरचे तापमान ४३.१ अंश सेल्सिअस, चंद्रपूर ४३.४अंश सेल्सिअस, वाशिम ४३.८ अंश सेल्सिअस, यवतमाळ ४५.५ अंश सेल्सिअस, नागपूर ४१.७ विदर्भातील सरासरी तापमान ४२.५२ अंश सेल्सिअस, मध्य महाराष्ट्र व मराठवाड्यातील तापमान ४० अंश सेल्सिअसच्या वर नोंद झाली.यावरून स्पष्ट होते की दिवसा तर उकाडा वाढलाच परंतु रात्रीही उकाड्याचे चटके संपूर्ण महाराष्ट्राला सहन करावे लागत आहे.राज्यातच नाही तर देशातील अनेक भागात सुर्य आग ओकतांना दिसतो आणि हा संपूर्ण प्रकार दिवसेंदिवस बदलत्या हवामानामुळे निर्माण झालेला आहे.गंगेच्या खोऱ्यातील पश्चिम बंगाल,पूर्व झारखंड, उत्तर ओडिशा आणि रायलसीमा येथे कमाल तापमानात वाढ झाली आहे.कारण नदी, तलाव, विहिरी, धरणे यांच्या पाण्याची पातळी कमी कमी होत आहे आणि ही परिस्थिती संपूर्ण महाराष्ट्रातच नाही तर देशासह संपूर्ण जगात आपल्याला पहायला मिळेल. महाराष्ट्रात तापमानाचा पारा सिमापार वाढल्याने कठीण परिस्थितीत निर्माण झाली आहे.कारण मानवाने केलेला निसर्गाचा ह्रास यामुळेच आज आपल्याला उन्हाचे चटके व पाणी टंचाईचा सामना करावा लागतो आहे. त्याचप्रमाणे मानवाने केलेल्या पापाचे प्रायश्चित्त मानव तर भोगतच आहे सोबतच पशुपक्षी, संपूर्ण जीवसृष्टी, पृथ्वी, आकाश-पाताळ,नदी-नाले,तलाव, धरणे, विहिरी यांनाही भोगावे लागत आहे.कारण राज्यासह देशातील वाढते तापमान हे दिवसेंदिवस निसर्गावर सरळ प्रहार करीत असुन संपूर्ण निसर्गाचे संतुलन ढासळत आहे त्यामुळे ही गंभीर समस्या निर्माण झाली आहे.त्यामुळे नागरिकांनी वाढत्या तापमानापासुन स्वतःला सांभाळणे गरजेचे आहे.बदलत्या हवामानामुळे यावर्षी पाऊस कमी झाला. त्यामुळे आतापासूनच राज्यातील अनेक भागात आपल्याला भिषण पाणी टंचाई दिसून येत आहे.जलाशयामध्ये फक्त २३.६३ टक्के जलसाठा उपलब्ध असल्याचे सांगितले जाते.म्हणजे एकीकडे तापमानात वाढ यामुळे आरोग्यावर विपरीत परिणाम,तर दुसरीकडे पाणी टंचाई अशा डबल गंभीर समस्यांशी आपणा सर्वांना झुंज द्यावी लागणार आहे.वाढत्या तापमानामुळे उष्णतेची व अवकाळी पावसाचे बादल महाराष्ट्रासह अनेक राज्यात दिसून येते.राज्यात वाढते तापमान पहाता आरोग्य विभागाने उष्माघातापासून बचाव करण्याचे आवाहन सुध्दा केले आहे.आज वाढत्या तापमानामुळे पशुपक्ष्यांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे त्यामुळे त्यांच्यासाठी आपापल्या पद्धतीने पाण्याची व्यवस्था केली पाहिजे व पशुपक्षांना वाढत्या तापमानापासुन दिलासा दिला पाहिजे.बदलते हवामान, पाणी साठा कमी होने,अती उष्णता, अवकाळी पाऊस याला रोखण्यासाठी राज्यासह देशात मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण व्हायला हवे.यामुळे वातावरणात आमुलाग्र बदल झाल्याचे दिसून येईल व निसर्ग प्रफुल्लित राहील.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(माजी विद्यापीठ प्रतिनिधी, नागपूर)**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# पाण्यासाठी दिल्लीचा टाहो


यंदा दिल्ली महानगर पाण्याविना तडफडते आहे. कसेबसे मिळालेले पाणी कुलूप लावून आणि रखवालीसाठी मुले बसवून जपण्याची वेळ आली आहे. यंदा उच्चभ्रू वस्त्याही पाणीटंचाईतून सुटल्या नाहीत. अशा तहानलेल्या दिल्लीकरांकडे कोण आणि कधी पाहणार?




प्लॅस्टिकचे ड्रम, छोटी-मोठी भांडी, बादल्या हे सारे सज्ज ठेवून रात्ररात्र पाण्याच्या टँकरसाठी जागणारी माणसं, टँकर येणार हे समजताक्षणी लागणाऱ्या लांब लांब रांगा, पाण्यासाठी मारामाऱ्या.. हे दृश्य मराठवाडा, विदर्भ, सोलापूर, मनमाड-येवल्यातले नसून ते राजधानीत जागोजाग दिसणारे दृश्य आहे. गेला पंधरवडाभर दिल्लीत सर्वत्र पाणीटंचाई आहे. पाण्यापाठोपाठ दिल्लीत वेळीअवेळी विजेविना अंधारही दाटत आहे.लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर अनेक भागांत निर्माण झालेल्या अभूतपूर्व पाणीटंचाईचा परीघ यंदा वसंत विहार, (कुसुमपूर) चाणक्यपुरीसारख्या उच्चभ्रू भागांपर्यंत गेला. याच चाणक्यपुरीत विविध देशांचे दूतावास आहेत. ज्या देशाच्या राजधानीतच पाण्याचे दुर्भिक्ष्य जाणवते, त्या देशात गुंतवणूक करण्याचा सल्ला कोणते राजदूत आपल्या उद्योगपतींना देतील? दिल्लीत स्वतःचे काही नसते. पाणी, भाजीपाला, अन्नधान्य आदींसाठी बहुतांश इतरांवरच अवलंबून रहावे लागते. मागच्या वर्षी पावसाळ्यात पुराने हाहाकार माजविणारे यमुनामाईचे पात्र जवळपास कोरडे पडले आहे. हरियाणातून वेळीच पाणी न सोडणे हे याचे एक कारण. प्रत्यक्षात राज्य सरकारच्या अखत्यारीतील दिल्ली पाणीपुरवठा मंडळाचा (दिल्ली जल बोर्ड-डीजेबी) भोंगळ कारभार हाही याला जबाबदार आहे. सध्या तुघलकाबाद, आनंद पर्वत, झंडेवालापासून पश्चिम विहारपर्यंतचा काही भाग, मंडावली, जोरबागेतील बी. के. दत्त कॉलनी, गीता कॉलनी, बुरारी, शक्तिनगर, राजकीय वरदहस्त लाभलेल्या अनधिकृत वस्त्या, पुनर्वसन वसाहती यासह अनेक परिसरांत पाणीटंचाई आहे. अनिर्बंध, बेबंद शहरीकरणाचा फटका दोन कोटींवर लोकसंख्येच्या दिल्लीलाही बसला आहे. त्यामुळेच दरवर्षी पाणीटंचाईच्या झळा वाढत आहेत. दिल्लीला रोज १३८० एमजीडी (दशलक्ष गॅलन) पाण्याची गरज आहे. उन्हाळ्यात जल बोर्डाला ७०० ते ९०० एमजीडी पाणी उपलब्ध होते. ओखला, बवाना, द्वारका, वजिराबाद, हैदरपूर इत्यादी जलशुद्धीकरण केंद्रांमध्ये यमुनेचे पाणी साठवले जाते व ते पिण्यायोग्य केले गेले की तेथून दिल्लीला पाणीपुरवठा होतो. वजिराबाद तलावाची पातळी यंदा इतिहासातील सर्वांत नीचांकी पातळीवर गेली आहे.हरियाणाने यंदाच्या उन्हाळ्यात यमुना नदीतून दिल्लीला सोडण्यात येणारे पाणी मोठ्या प्रमाणात कमी केले आहे. दिल्लीतील रोजची पाण्याची आवक १०० एमजीडीने घटली. दिल्ली-हरियाणा पाणी वाद नवा नाही. पण सर्वोच्च न्यायालयाने अलीकडेच पंजाब सरकार आणि भाक्रा-व्यास व्यवस्थापन मंडळाला दिल्लीचा पाणी पुरवठा पूर्वीप्रमाणेच चालू ठेवण्याबाबत नोटीस बजावली आहे.दिल्लीतील पाण्याच्या वाढत्या संकटावर नुकत्याच आलेल्या एका व्हिडिओतील दृश्य करूण आहे. यात एका वस्तीतील लोक टँकरमधून पाणी भरल्यानंतर ते प्लॅस्टिक ड्रम्स कुलपाने व साखळ्यांनी बांधून ठेवताना दिसत आहेत. नंतर त्या ड्रमची राखण करण्यासाठी छोट्या छोट्या बालकांना तेथे बसवून ठेवले जाते. दिल्लीत डबल इंजिन सरकारची भानगड नाही. पण दुर्दैवाने त्यामुळेच पाणीसंकट गडद होत असावे. पाण्याच्या टंचाईवरून सत्तारूढ आम आदमी पक्ष व भाजप यांच्यात जोरदार राजकीय वादंग सुरू आहे. अरविंद केजरीवाल यांच्या सत्तारुढ आम आदमी पक्षाच्या मते या जलसंकटाला हरियाणाचे (भाजप) सरकारच जबाबदार आहे व हरियाणा सरकारच्या नाकर्तेपणामुळे नवी दिल्लीतील राष्ट्रपती भवन, आंतरराष्ट्रीय दूतावास आणि मध्य, पूर्व, दक्षिण आणि पश्चिम दिल्लीच्या अनेक भागांत पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार हरियाणा सरकार दिल्लीला पाणी देत नाही, असाही आरोप आम आदमी पक्षाने केला आहे.भाजपने यावर प्रत्युत्तर देताना पाणीसंकट दिल्ली सरकारमुळेच निर्माण झाल्याचा दावा केला. भाजपच्या आरोपानुसार मुख्यमंत्री केजरीवाल प्रत्येक निवडणुकीपूर्वी दिल्लीतील सर्व वसाहतींमध्ये शुद्ध पाणी मिळण्यासाठी जलवाहिन्या टाकण्याचे आश्वासन देतात. मात्र, गेल्या १० वर्षांत दरवर्षी उद्भवणाऱ्या पाणीटंचाईच्या परिस्थितीत कोणताही बदल झालेला नाही. दिल्ली पाणीपुरवठा मंडळाने वाढत्या लोकसंख्येनुसार आपल्या जलशुद्धीकरण केंद्रांची देखभाल-दुरुस्ती केलेली नाही. लोकसभा निवडणुकीत केजरीवालांशी आघाडी केलेल्या काँग्रेसनेही यावरून केजरीवाल यांना धारेवर धरले. दिल्ली प्रदेश काँग्रेस समितीच्या म्हणण्यानुसार घरोघरी २४ तास मोफत पाणी देण्याची केजरीवाल सरकारची घोषणा पूर्णपणे पोकळ ठरली आहे. काँग्रेसच्या दाव्यानुसार मोफत पाण्याचे दिल्ली सरकारचे दावेही खोटे दिल्लीतील फक्त १३ टक्के कुटुंबांना मोफत पाण्याचा लाभ मिळतो.यंदाच्या सार्वत्रिक निवडणुकांचा अध्याय आता समारोपाकडे आहे. आज दिल्लीत मतदान सुरू आहे. निवडणूक आटोपली की नेत्यांवरील प्रचाराचा ताण संपेल. त्यामुळे व्होट जिहाद, कोण मांसाहार करतो, कोण मंगळसूत्राला हात घालणार, कोण राज्यघटना बदलण्यास निघाले आहे, कोणाला केंद्राची एखादी नवी योजना कचराकुंडीत फेकावीशी वाटते... वगैरे 'राष्ट्रविकासाच्या ज्वलंत' मुद्द्यांची चर्चा थांबेल. मग देशाच्या राजधानीत तरी धड पाणीपुरवठा तरी व्हावा, याकडे लक्ष देण्यास नेत्यांना उसंत मिळेल.

# जालन्याच्या 'त्या' तरूणांवरील अत्याचाराची पालकमंत्री ना.पंकजाताई मुंडे घेतली गंभीर दखल

## जिल्हा पोलीस अधीक्षकांशी केली चर्चा; आरोपींविरुद्ध कठोर कारवाईचे आदेश



**जालना (प्रतिनिधी):** अन्वा (ता. भोकरदन) येथील कैलास बोराडे या तरूणांवर झालेल्या अत्याचार प्रकरणाची जिल्ह्याच्या पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी गंभीर दखल घेतली असून यासंदर्भात त्यांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांना आज दूरध्वनीवरून संपर्क साधून आरोपींविरुद्ध कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. दरम्यान, त्या तरूणाच्या कुटुंबियांनी ना. पंकजाताईंची मुंबईत भेट घेतली.

महाशिवरात्रीच्या दिवशी अन्वा येथील रहिवासी असलेल्या कैलास बोराडे या तरुणास कार्ला जानेफळ येथील वटेश्वर मंदिरात भागवत दौंड व नवनाथ दौंड यांनी मारहाण करून भट्टीत गरम केलेल्या सळईने सर्व अंगावर डाग देऊन अतिशय अमानुषपणे अत्याचार केले. बोराडे याच्यावर सध्या रूग्णालयात उपचार सुरू आहेत, दरम्यान पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज पोलिस अधिक्षकांशी फोन करुन घटनेची सविस्तर माहिती घेतली. या घटनेतील एक आरोपी अटकेत आहे. दुसर्याचा शोध तातडीने लावून त्यांच्यावर कठोर कारवाई करावी असे आदेश त्यांनी पोलिस अधीक्षकांना दिले. दरम्यान कैलास बोराडे या तरूणांच्या भावाने आणि कुटुंबातील सदस्यांनी ना. पंकजाताई मुंडे यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी कैलासच्या प्रकृतीची आस्थेने चौकशी केली आणि आरोपींविरुद्ध कठोर कारवाई करण्याबद्दल कुटुंबियांना आश्वस्त केले.

# वंचित बहुजन युवा आघाडीच्या वतीने वडवणी ते चिंचोटी रस्त्यासाठी जागरण गोंधळ

**वडवणी (प्रतिनिधी):** वडवणी ते चिंचोटी रस्त्यावरील मोठमोठे खड्डे पडल्याने वाहन धारकांना मोठी कसरत करावी लागत आहे. खड्ड्यात काल जागरण गोंधळ घालण्यात आला. रस्त्यावरील खड्डे तात्काळ बुजवावे व या रस्त्याला मंजुरी न मिळाल्यास आमदार प्रकाश सोळंके यांच्या घरासमोर जागरण गोंधळ घालण्याचा इशारा वंचित बहुजन युवा आघाडीचे वडवणी तालुकाध्यक्ष विनोद काकडे यांनी दिला आहे.




वडवणी ते चिंचोटी पाच किलोमीटर रस्ता आहे.यातील दोन किलोमीटरचे काम झाले व तिन किलोमिटरच्या रस्त्यावर मोठ मोठे खड्डे पडल्याने या रस्त्याची दयनिय आवस्था झाली आहे.या रस्त्यावरून जातांना प्रवाशांना जिवघेणा प्रवास करावा लागत आहे. या रस्त्यासाठी प्रशासनाला वेळो वेळी निवेदने दिलेले आहेत परंतु याकडे दुर्लक्ष केले जात आहे.या झोपलेल्या प्रशासनाला जाग करण्यासाठी वडवणी चिंचोटी रोडवरील खड्यात जागरण गोंधळ आंदोलन करण्यात आले.यावेळी वाहनधारक, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आम्ही तात्काळ खड्डे बुजवण्यासाठी निधीचा प्रस्ताव व रस्ता मंजुरी साठी प्रस्ताव वरीष्ठांकडे पाठवु असे लेखी निवेदन आंदोलकांना देण्यात आले.

# भय्यु जोशीला शिवसैनिक महाराष्ट्रात फिरु देणार नाहीत-जिल्हाप्रमुख गणेश वरेकर

**बीड (प्रतिनिधी):** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे भयु जोशी यांनी मुंबईत मराठी बोलण्याची गरज नाही व गुजराती बोला हे बोलल्यामुळे त्यांच्या या विधानाचा निषेध करण्यासाठी आज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने पक्षप्रमुख उद्धव साहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार व संपर्कनेते सुनिल प्रभू साहेब व संपर्कप्रमुख परशुराम जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हामुख गणेशभाऊ वरेकर यांच्या नेतृत्वाखाली व तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन यांच्या प्रमुख उपस्थितीत बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर भय्यु जोशी व भाजपचा जाहीर निषेध करून, त्यांच्याविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली यावेळी जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर व तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन यांनी




सांगितले की, मराठी भाषेला मुंबईतून हद्दपार करण्याचा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा व भाजपाचा डाव शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे हाणुन पाडील व आपले शब्द पाठीमागे न घेतल्यास आम्ही जोशीला फिरु देणार नाही असा इशारा दिला.या आंदोलनाला गोरख अण्णा सिंघन , जिल्हा संघटक रतनतात्या गुजर ,जिल्हासहसचिव श्रीकृष्ण गायके , तालुका संघटक राजेश काकडे, युवासेना बीड य तालुका युवा आधिकरी अधिकारी गायके , उपतालुकाप्रमुख दादासाहेब सोनवणे,उप तालुका प्रमुख अशोक सगळे,तालुका सचिव नंदकुमार येवले,किसान सेनेचे तालुका संघटक भिमराव कुटे, सर्कल प्रमुख दत्ता सुरवसे, सर्कल प्रमुख अशोक खांडे , माजी सरपंच सखाराम तात्या मोहीते ,उपसरपंच बाळासाहेब कुटे, उपसरपंच बाळासाहेब वरेकर , युवानेते मुकेश घुमरे , भगवान तावरे, मुन्ना जाधव, विलास शिरसाट,अभिषेक वरेकर,नितीन सोनकांबळे,सिद्धार्थ सोनकांबळे,विकास शिंदे,अशोक शिंदे,महेश काकडे,आकाश पांढरे,बाळू वरेकर,अशोक खांडे, भरत खरात,किरण पांढरे,अशोक वैद्य,अभय काळे, तावरे मामा ,विलास क्षीरसट रमेश अप्पा आदी

# खा.धानोरकर यांच्या हस्ते वनोजा ग्रामपंचायत भवनाचे लोकार्पण

## गावाच्या विकासासाठी सदैव तत्पर राहण्याचे आश्वासन

**वरोरा । प्रतिनिधी**

तालुक्यातील वनोजा ग्रामपंचायत भवनाचे लोकार्पण बुधवार, दि. ५ मार्च रोजी खासदार प्रतिभा धानोरकर यांच्या हस्ते संपन्न झाले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच शालूबाई उताणे होत्या, तर उद्घाटन खासदार प्रतिभा धानोरकर यांनी केले. प्रमुख पाहुणे म्हणून माजी संचालक जिल्हा मध्यवर्ती बँक चंद्रपूर वसंतराव विधाते, माजी जिल्हा परिषद सदस्य सुनंदाबाई जिवतोडे, पंचायत समितीच्या माजी उपसभापती संजीवनी भोयर उपस्थित होते.

ग्रामपंचायत भवन लोकार्पण सोहळयास ग्रामपंचायत सचिव घारगे, उपसरपंच सचिन बुरडकर, सदस्य आकाश उताणे, प्रवीण परचाके, अंजू लांडे, शीतल गमे, अनिता झाडे, माजी जिल्हा परिषद सदस्य देविदासपाटील कष्टी, पत्रकार आशिष घुमे यांची उपस्थिती होती.गावाच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक सुविधा पुरवण्यासाठी आपण नेहमीच कटिबद्ध राहू, असे आश्वासन खासदार प्रतिभा धानोरकर यांनी दिले. गावातील मूलभूत सुविधा, रस्ते, पाणीपुरवठा आणि आरोग्यविषयक उपाययोजनांसाठी प्रयत्नशील राहण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

ग्रामपंचायत भवन लोकार्पण सोहळ्यात ग्रामपंचायत सचिव सचिन घारगे यांनी गावाच्या विकासाचा आराखडा वाचून दाखविला, तर वसंतराव विधाते यांनी आपल्या मनोगतातून खासदार प्रतिभा धानोरकर यांनी केलेल्या सहकार्याबद्दल आभार मानले.कार्यक्रमाचे संचालन जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापिका शारदा उमरे यांनी केले, तर आभार उपसरपंच सचिन बुरडकर यांनी मानले.यावेळी महिलांसाठी हळदी-कुंकू कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमानंतर समस्त ग्रामस्थांसाठी स्नेहभोजन आयोजित करण्यात आले.



# उद्योगांना अडथळा आणणाऱ्यांवर थेट मोक्का-मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील उद्योगधंद्यांना अडथळा आणणाऱ्यांना थेट मोक्का लावण्यात येईल, अशी मोठी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.टीव्ही ९ कॉनक्लेव्हमध्ये बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, उद्योग महाराष्ट्राबाहेर जात असल्याचा आरोप निराधार आहे. तसेच, २०३० पर्यंत महाराष्ट्र ट्रिलियन डॉलर इकॉनॉमी होणार असून, हे लक्ष्य २०२८ पर्यंत गाठण्याचा प्रयत्न केला जाईल.

कोरोनामुळे दोन वर्षे आर्थिक झळ बसली, तरी महाराष्ट्र वेगाने प्रगती करत आहे, असेही फडणवीस



यांनी स्पष्ट केले. टीव्ही ९ मराठीचे व्यवस्थापकीय संपादक उमेश कुमावत आणि टीव्ही ९ भारतवर्षचे डिप्टी एग्जिक्युटिव्ह प्रोड्यूसर गौरव अग्रवाल यांनी त्यांची मुलाखत घेतली.

# एप्रिलमध्ये नगरच्या विस्तारित एमआयडीसीचे भूमिपूजन

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

नगर तालुक्यातील विळद येथे होणाऱ्या नवीन विस्तारित एमआयडीसीचे भूमिपूजन एप्रिल महिन्यात उद्योग मंत्री उदय सामंत आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या उपस्थितीत होणार आहे.



आज मंत्रालयात उद्योग मंत्र्यांच्या उपस्थितीत बैठकीत या भूमिपूजनाबाबत चर्चा झाली. या बैठकीस पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आमदार मोनिकाताई राजळे, आमदार काशिनाथ दाते, डॉ. सुजय विखे पाटील, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि कामगार विभागाचे अधिकारी तसेच पारनेर तालुक्यातील प्रतिनिधी गणेश शेळके, सुजित झावरे, विजू आवटी, राहुल शिंदे, सचिन वरात आदी उपस्थित होते.

बैठकीत सुपा एमआयडीसीतील उद्योजकांच्या समस्या, वन विंडो सिस्टीम अंतर्गत सुलभ प्रक्रिया, तसेच एमआयडीसीच्या डेप्युटी सीईओ यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या समितीबाबत निर्णय घेण्यात आला.उद्योग मंत्री उदय सामंत यांनी नगर जिल्ह्यातील शिर्डी, श्रीगोंदा आणि नवीन नगर एमआयडीसीमध्ये अधिक उद्योगधंदे आणण्याचे आणि रोजगाराच्या संधी वाढवण्याचे आश्वासन दिले. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी स्थानिक भूमिपुत्रांना रोजगाराच्या संधी मिळाव्यात यासाठी नवीन उद्योगांनी प्रयत्न करावेत, अशी विनंती केली.बैठकीदरम्यान काशिनाथ दाते यांनी आभार मानले, तर एप्रिलमध्ये पुढील बैठकीत उद्योगवाढीच्या अनुषंगाने आढावा घेतला जाईल, असे डॉ. सुजय विखे पाटील यांनी सांगितले.

# अजित पवारांकडे धनंजय मुंडेंच्या खात्याचा अतिरिक्त पदभार कारभार केव्हापर्यंत सांभाळणार अन् नंतर कुणाकडे सोपवणार?

**मुंबई (वृत्तसंस्था)**–मस्सोजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्याकांडमुळे अडचणी आलेल्या धनंजय मुंडेंना मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला. यामुळे त्यांच्या जागी आता कोणाला संधी मिळणार? अशा चर्चा सुरू झाल्या असतानाच मुंडेंच्या खात्याचा कारभार अजित पवारांनी आपल्याकडे घेतला आहे. अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण खात्याचा कारभार आपल्याकडे घेतला आहे.सोमवारी संतोष देशमुख यांच्या हत्येचे फोटो समोर आल्यानंतर एकच संतापाची लाट उसळली आहे. यानंतर अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी मंगळवारी धनंजय मुंडे यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला. त्यांच्याकडे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण हे खाते होते. धनंजय मुंडेंच्या राजीनाम्यानंतर त्यांच्याकडील खात्याचा पदभार कोणाकडे जाणार असा प्रश्न उपस्थित झाला होता.

धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्यानंतर हा विभाग रिक्त होता. मात्र, अर्थसंकल्पीय अधिवेशनात या खात्याशी संबंधित प्रश्न सभागृहात विचारले जाऊ शकतात. त्यामुळे अजित पवार यांनी तूर्तास या खात्याचा कार्यभार स्वत:कडे घेतला. अर्थसंकल्पीय अधिवेशनात या विभागासंबंधीच्या प्रश्नांना आता ते उत्तर देतील. मात्र, अजित पवार हा अतिरिक्त कार्यभार कधीपर्यंत सांभाळणार आणि हे खाते राष्ट्रवादीतील कोणत्या मंत्र्याच्या पदरात टाकणार,याविषयी अद्याप कोणतीही माहिती समोर आलेली नाही.धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्यानंतर आता राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये हालचालींना वेग आला आहे. धनंजय मुंडेंच्या जागी आता छगन भुजबळांची सरकारमध्ये एन्ट्री होणार का? अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरु झाली आहे. त्यांच्याकडे दांडगा अनुभव आहे, त्यामुळे आता धनंजय मुंडे यांच्या जागी छगन भुजबळ सक्षम पर्याय आहेत, असे म्हटले जात आहे. तर दुसरीकडे धनंजय मुंडेंच्या जागी बीडमधील आमदारालाच मंत्रिपद देण्याची शक्यता असल्याची चर्चा आहे. प्रकाश सोळंके आणि विजयसिंह पंडित यांच्या नावाची चर्चा सुरू असल्याचे बोलले जात आहे.संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात वाल्मीक कराड हा मुख्य मास्टरमाइंड असल्याचा दावा सीआयडीने दाखल केलेल्या आरोपपत्र केला आहे. वाल्मीक कराड माजी मंत्री धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय मानला जातो. संतोष देशमुख यांची हत्या झाल्यापासून धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात येत होती. पण सरकारने राजीनामा घेतला नाही. दरम्यान, संतोष देशमुख यांना अमानुष मारहाण करतानाचे धक्कादायक फोटो समोर आले. सैतानालाही लाजवेल अशा प्रकारे संतोष देशमुख यांची हत्या केल्याचे या फोटोंमधून दिसून आले. त्यामुळे धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेणे सरकारला भाग होते. त्यांनी तो घेतला.



# भरकटलेल्या समाजाला दिशादर्शक कार्य समाजसेवेच्या माध्यमातून होत असते-रमेश पोकळे

## मोबाईल अतिवापरामुळे हारवत चाललेला संवाद उद्याच्या उज्वल पिढीसाठी वाढविणे आवश्यक-सौ.संध्याताई बारगजे

## वसंतराव काळे आणि संभाजीराजे महाविद्यालयात जागतिक महिला दिनानिमित्त सौ.संध्याताई बारगजे, सौ.सीमाताई ओस्तवाल,सौ.अनिताताई भोसले,सौ. मनीषाताई पवार यांचा कार्य गौरव सोहळा संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

आजच्या युगामध्ये सामाजिक बांधिलकी जोपासून समाजासाठी कार्य करणाऱ्या व्यक्तींची संख्या अगदी बोटावर मोजण्या इतकी आहे. आजही समाजातील अनेक घटकाला रोजच्या दैनंदिन गरजा पूर्ण करण्यासाठी अनेक अडचणीचा सामना करावा लागतो. आपलं जीवन कुठेतरी समाजाच्या उपयोगी यावे, या जाणिवेतून सौ.संध्याताई बारगजे, सौ. सीमाताई ओस्तवाल, सौ. अनिताताई भोसले आणि सौ. मनीषाताई पवार सामाजिक बांधिलकी जोपासत समाजाच्या उध्दारासाठी अतुलनीय कार्य करत आहेत. त्यांचे कार्य आजच्या भरकटलेल्या समाजाला दिशादर्शक आहे. असे प्रतिपादन संस्था अध्यक्ष आणि कार्यक्रमाचे अध्यक्ष रमेश भाऊ पोकळे यांनी केले आहे. तर सु-संवाद हा उद्याची चांगली पिढी निर्माण करण्यासाठी अवश्यक असतो. आजची युवा पिढी मोबाईलच्या अतिवापरामुळे संवादापासून दूर जात आहे. युवकांनी मोबाईलचा अतिवापर न करता सु-संवाद अधिक केला पाहिजे, अशा कार्यक्रमाच्या माध्यमातून चांगला सु-संवाद होत असतो. आपल्या जीवनात यशस्वी होण्यासाठी युवकांनी चांगल्या गुणांना आत्मसात करावे असे मोलाचे मार्गदर्शन सौ. संध्याताई बारगजे यांनी केले.

येथील वसंतराव काळे कॉलेज ऑफ जर्नालिज्म अँड कम्प्युटर सायन्स बीड आणि संभाजी राजे कॉलेज ऑफ लायब्ररी अँड मॅनेजमेंट सायन्स बीड यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनानिमित्त विविध क्षेत्रात यशस्वी कार्य करणाऱ्या महिलांचा सेवगौरव कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून रमेश पोकळे बोलत होते. कार्यक्रमाला व्यासपीठावर प्रमुख पाहुणे नायब तहसीलदार सतीश कदम, प्रमुख पाहुणे आणि सत्कारमूर्ती म्हणून इन्फंट इंडियाच्या सौ.संध्याताई बारगजे, गुरु आनंद महिला प्रतिष्ठानच्या सौ. सीमाताई ओस्तवाल, राजमुद्रा प्रतिष्ठानच्या सौ.अनिताताई भोसले, आपला परिवार अनाथ वृद्धाश्रम च्या सौ. मनीषाताई पवार तर प्रदीप सुरवसे आणि प्राचार्य बप्पासाहेब हावळे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी सरस्वती राजमाता जिजाऊ आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे मान्यवरांचे हस्ते पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. यावेळी महिला दिनाचे औचित्य साधून विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत



असल्याबद्दल सौ.संध्याताई बारगजे, सौ. सीमाताई ओस्तवाल,सौ. अनिताताई भोसले, सौ. मनीषाताई पवार यांचा गौरव संस्थेचे अध्यक्ष रमेश भाऊ पोकळे आणि मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. पुढे बोलताना रमेश पोकळे म्हणाले की, समाजातील प्रत्येक घटकाला सन्मानाने आपले जीवन जगता यावे. यासाठी समाजातील प्रत्येक व्यक्तीने त्या दृष्टीने कार्य करणे गरजेचे आहे. आजच्या सत्कारमूर्ती अतिशय समर्पणाने, सेवाभावृत्तीने गेल्या अनेक वर्षापासून समाजसेवा करत आहेत. त्यांच्या कार्याचे कौतुक करावे तेवढे कमीच आहे. त्यांचे कार्य आजच्या युवा पिढीला दिशादर्शक आणि प्रेरणादायी आहे असेही रमेश पोकळे म्हणाले. यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना सौ. संध्याताई म्हणाल्या की, जेष्ठ समाजसेवक बाबा आमटे यांच्या कार्यातून समाजसेवा करण्याची ऊर्जा आणि बळ मिळाले. ते अविरत चालूच राहिल, आजच्या युवकांना जास्तीत-जास्त संवाद करण्याची गरज आहे. मोबाईलच्या अतिवापरामुळे संवाद हारवत चालला आहे. तो संवाद वाढविण्यासाठी सर्वांनी प्रयत्न केले पाहिजेत. अशा सत्काराने आणि कौतुकाने अधिक काम करण्यासाठी ऊर्जा मिळते. असेही संध्याताई म्हणाल्या. तर आपले मनोगत व्यक्त करताना सौ.सीमाताई ओस्तवाल म्हणाल्या की, समाजकार्य करण्यासाठी अनेकांनी पुढे आले पाहिजे, समाजाला त्याची अधिक गरज आहे. महिलांचा सन्मान महिला दिनाच्या दिवशीच न होता. तो सतत झाला पाहिजे अशाही भावना यावेळी त्यांना व्यक्त केली. यावेळी बोलताना सौ.अनिताताई भोसले म्हणाल्या की, आजच्या स्त्रीने सामाजिक जीवनामध्ये वावरत असताना अधिकाधिक सक्षमतेने वावरले पाहिजे. आपले मानसिक आणि शारीरिक आरोग्य देखील उत्तम ठेवण्याकडे त्यांना विषेश लक्ष दिले पाहिजे, असा मोलाचा संदेश त्यांनी दिला. यावेळी सौ. मनीषाताई पवार यांनीही विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य बप्पासाहेब हावळे यांनी केले. तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.राजश्री महाजन आणि प्रा. पल्लवी जगताप यांनी केले. शेवटी आभार प्रा. रफिक सय्यद यांनी मानले. या कार्यक्रमाला प्रा.सुहास गाढवे,प्रा. कोमल सुरवसे, महेश नेवडे, दीपक जाधव, संध्या खोसे, सचिन चौरे, खोड यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लोकनेते गोपीनाथराव मुंडे मागासवर्गीय सूतगिरणीच्या बोगस कागदपत्रांचा पर्दाफाश

**केज । प्रतिनिधी**

लोकनेते गोपीनाथराव मुंडे मागासवर्गीय सूतगिरणी लहुरी ता. केज ही बोगस व बनावट कागदपत्रांच्या आधारे स्थापन करण्यात आली असून, यामुळे शासनाची मोठी फसवणूक झाली आहे. बीड जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांत शिकणाऱ्या ३४६ विद्यार्थ्यांची जात वैधता प्रमाणपत्रे परस्पर जात पडताळणी विभागामार्फत हस्तगत करण्यात आली आहेत. यामुळे शासनाकडून मिळवलेले ४१ कोटी रुपये त्यामध्ये वस्त्रोद्योग विभागाकडून २७ आणि समाज कल्याण विभागाकडून १४ कोटी रुपयांच्या रकमेची शासनाची फसवणूक झाली आहे. तसेच या सूतगिरणीने ग्रामपंचायतीचा बांधकाम परवाना घेतलेला नाही. फसवणूक संदर्भात ज्या व्यक्तींचे नाव समोर येत आहे, त्यात माजी आमदार संगीता



ठोंबरे आणि चेअरमन विजय प्रकाश ठोंबरे यांचा समावेश आहे. केज पोलीस उपविभागीय अधिकारी कमलेश मीना यांच्या वर्तमनातील कार्यवाहीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे, कारण दीड वर्षांपासून याप्रकरणी कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. यासंदर्भात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, गृहमंत्री, गृहसचिव आणि पोलीस महानिरीक्षकांनी आदेश दिले होते. तथापि, केज पोलीस स्टेशनच्या अधिकारी आणि कर्मचारी त्याच्यावर कारवाई करण्यास टाळाटाळ करीत आहेत. या सर्व घटनाक्रमाबाबत, तक्रार करण्याच्या प्रक्रियेत असलेल्या तक्रारदारांना पोलिसांकडून दबाव तंत्राचा वापर करण्याचीही बाब समोर आली आहे. प्रमुख निवेदनः पीपल्स रिपब्लिकन पार्टीच्या बीड जिल्हाध्यक्ष अनिल तुरुकमारे या प्रकरणाची आठ दिवसांत उच्चस्तरीय चौकशी व गुन्हा नोंद न झाल्यास, उपविभागीय पोलीस अधिकारी आणि केज पोलीस स्टेशनच्या विरोधात मुंबई आझाद मैदानावर दि. २१ मार्च २०२५ रोजी पासुन आमरण उपोषण करण्यात येणार आहे असे निवेदनात म्हटले आहे.

## महाराष्ट्रातील लाखो नागरिक होणार वीज बिलमुक्त
## शेतकऱ्यांना ३६५ दिवस वीज उपलब्ध होणार-मुख्यमंत्र्यांची मोठी घोषणा

**मुंबई (वृत्तसंस्था)**-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत मोठी घोषणा केली आहे. महाराष्ट्रातील वीज ग्राहकांसाठी योजना जाहीर करण्यात आली असून, यातून लाखो वीज ग्राहकांना वीज बिलमुक्ती मिळणार असल्याचे फडणवीस यांनी सांगितले आहे. प्रधानमंत्री सौरघर योजनेच्या धर्तीवर राज्यात नवीन योजना सुरू करण्यात येणार आहे. तसेच शेतकऱ्यांना ३६५ दिवस वीज उपलब्ध होणार असल्याचे देखील मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, नवीन वीज धोरणांतर्गत स्मार्ट मीटर बसवणाऱ्या ग्राहकांना व जे दिवसा वीज वापरतील त्यांना १० टक्के वीज दरात सवलत दिली जाणार आहे. हे ग्राहक आपल्या विजेच्या वापरावर अधिक चांगल्या पद्धतीने नियंत्रण ठेऊ शकतील आणि यामुळे राज्याच्या ऊर्जा बचतीला हातभार लागेल. जी वीज आपल्याला ८ रुपयांना पडत होती ती आता केवळ ३ रुपयांना पडणार आहे, म्हणजे यूनिटमागे ५ रुपये आपण वाचवत आहोत. याचा जवळपास ७० टक्के ग्राहकांना थेट फायदा होणार असल्याचेही फडणवीस यांनी म्हटले आहे.देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्यातील ७० टक्के ग्राहक हे ० ते १०० युनिट वीज वापरणारे आहेत. सरकारच्या नव्या योजनेनुसार, या ग्राहकांना सौरऊर्जा प्रकल्पांतर्गत वीज मोफत मिळणार आहे. सोलर पॅनल बसवण्यासाठी अनुदान देण्यात येणार आहे, ज्यामुळे दीड कोटी ग्राहकांना विजेबिलाचा भार सहन करावा लागणार नाही.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केलेल्या बळीराजा मोफत वीज योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना देखील मोठा दिलासा मिळणार आहे. देवेंद्र फडणवीस म्हणाले, बळीराजा मोफत वीज योजना लागू करण्यात आली असून, याचा फायदा तब्बल ४५ लाख कृषी पंपधारकांना होणार आहे. या योजनेसाठी सरकारने १४ हजार कोटी रुपये तरतूद केली आहे. यामध्ये शासनाच्या सबसिडीची ५,५०० कोटींची बचत होणार आहे आणि एकूण वीज खरेदी खर्चात १० हजार कोटी रुपयांची बचत या माध्यमातून होणार आहे.या योजनेमुळे कार्बन उत्सर्जनात २५ टक्क्यांची कपात होणार आहे. मुख्यमंत्री कृषी वाहिनी प्रकल्पाअंतर्गत, २०२६ पर्यंत शेतकऱ्यांना संपूर्ण सौरऊर्जेवर आधारित वीजपुरवठा केला जाणार आहे. यामुळे शेतकऱ्यांना ३६५ दिवस वीज उपलब्ध होणार असून, विजेच्या किमतीत मोठी कपात होईल.

## जागतिक महिला दिन वसुंधरा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात साजरा



**केज । प्रतिनिधी**

जागतिक महिला दिन कार्यक्रम कै.भुजंगराव सेवा प्रतिष्ठान सारणी संचलित वसुंधरा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, पैठण (सा) तालुका केज मध्ये जागतिक महिला दिन कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक सुशीलकुमार गायकवाड प्रमुख अतिथी गावच्या प्रथम नागरिक सरपंच सौ.जयश्री ताई चौधरी,प्रमुख पाहुणे श्रीम.शैला कदम,श्रीम. मिरा खोडसे (येडेश्वरी इंग्लिश स्कूल) सौ अर्चना बारसागडे यांच्या प्रमुख उपस्थितीत जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. सर्वप्रथम क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. विद्यालयातील विद्यार्थिनींनी महिलांविषयी आपले मनोगत व्यक्त केले. प्रमुख अतिथी सौ. जयश्रीताई चौधरी यांनी महिला अबला नसून सबला आहेत. प्रत्येक क्षेत्रामध्ये महिलांचे उल्लेखनीय कार्य असल्यामुळे समाज प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत आहे असे प्रतिपादन केले. श्रीम मीरा खोडसे यांनी महिलांना अनेक क्षेत्रांमध्ये संधी उपलब्ध आहेत परंतु आपल्या आवडत्या क्षेत्रामध्ये करिअर केले तर अधिक प्रभावी ठरते. रूडी परंपरा आपल्या विकासास बाधक ठरत असतील तर त्या परंपरांना आपण दूर ठेवले पाहिजे असे प्रतिपादन केले. आज महिला आदर्श माता, बहीण,पत्नी आहे.एक महिला शिकली तर दोन्ही घराचा उद्धार करू शकते त्यामुळे समाजामध्ये महिलांना सन्मानपूर्वक वागणूक दिली पाहिजे, महिलांचा आदर केला पाहिजे असे शैला कदम मॅडम यांनी आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री सुशीलकुमार गायकवाड सर यांनी आज महिला उच्च शिक्षण घेत असल्यामुळे प्रत्येक क्षेत्रामध्ये आपल्या कार्याचा ठसा उमटवीत आहे. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या यशामध्ये महिलांचा सिंहाचा वाटा आहे सर्वांना जागतिक महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा देऊन महिला विषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आयोजन श्रीमती दीपमाला डाके मॅडम यांनी केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता आठवीच्या मुली संचिता चौधरी व जोगदंड तर आभार प्रदर्शन श्री हनुमंत चौधरी सर यांनी केले.

## आ.विजयराजे पंडित यांचा मंत्रिमंडळात समावेश करा-समर्थ सेनेची मागणी

**मुंबई (प्रतिनिधी):** मागील अनेक वर्षांपासून मराठवाडा व बीड जिल्ह्य विकासापासून मागासलेला आहे ऊसतोड कामगारांचा बीड जिल्हा म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात ओळखला जातो या जिल्ह्याच्या विकासासाठी गेवराई विधानसभेचे आमदार विजयराजे पंडित या तरुण व खंबीर अशा युवक नेतृत्वाची मंत्रिमंडळात गरज असून आमदार विजयराजे पंडित यांनाच मंत्रिमंडळात संधी द्यावी अशी मागणी समर्थ सेनेचे संस्थापक अध्यक्ष महेश कुलकर्णी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस , उपमुख्यमंत्री अजितदादा पवार , उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत गेवराई विधानसभा मतदारसंघातून निवडून आलेले उमेदवार विजयसिंह पंडित हे तरुण युवक आमदार आहेत त्यांना सर्वसामान्य जनता व युवकांच्या प्रश्नाची जाणीव आहे तसेच बीड जिल्ह्यातील विकासाचे अनेक महत्त्वाचे प्रश्न त्यांनी बीड जिल्हा परिषद चे अध्यक्ष असताना सोडवलेले आहेत बीड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष म्हणून कार्यरत असताना बीड जिल्ह्यातील खेडे पाडे वाडे वस्ती पांडे आदी भागात मोठी विकासाची कामे केली आहेत विविध शासनाच्या योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्याचे कार्य केलेले आहे सर्वसामान्य जनतेचा तसेच शेतकऱ्यांचे हित जोपासण्याचे कार्य त्यांनी केलेले आहे यामुळे संपूर्ण बीड जिल्ह्यात विजयसिंह पंडितांना मानणारा वर्ग आहे व जिल्ह्यातील तरुण युवक ही त्यांच्या पाठीशी सक्षमपणे उभा आहे सर्व जाती धर्मातील नागरिकांना सोबत घेऊन चालणारे व्यक्तिमत्व म्हणून विजयसिंह पंडित यांची ख्याती आहे गेवराई विधानसभे चे आमदार या नात्याने ते संपूर्ण जिल्हाभरातील लोकांची संपर्क ठेवून आहेत विकास कामाच्या बाबतीत एक अनुभवी नेतृत्व म्हणून विजयसिंह पंडित यांच्याकडे पाहिले जाते माजी उपमुख्यमंत्री शिवाजीराव दादा पंडित, माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली गेवराई विधानसभेत आमदार झाल्यानंतर विजयसिंह पंडित यांनी सर्वसामान्य जनतेच्या व मतदार बांधवांच्या प्रत्यक्षात गाठीभेटी घेऊन विकास कामांना नाही मोठे बळ देण्याचा प्रयत्न केला आहे विजयसिंह पंडित हे गेवराई विधानसभेचे जरी आमदार असले तरी बीड जिल्ह्यातून इतरत्र मतदार संघातून अनेक लोक त्यांच्याकडे कामानिमित्त जातात व ते सर्वांचीच कामे लक्षपूर्वक करतात अडचणीतल्या माणसाला न्याय देण्याचे कार्य ते सातत्याने करतात यामुळे सर्व क्षेत्रातील काम करणारे लोक विजयसिंह पंडितांच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहेत याची दखल महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस उपमुख्यमंत्री अजित दादा पवार व मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे व पक्षश्रेष्ठींनी घेऊन आमदार विजयसिंह पंडित हे सक्षम आमदार आहेत यांना महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळात मंत्री म्हणून कार्य करण्याची संधी उपलब्ध करून द्यावी अशी मागणी समर्थ सेनेचे संस्थापक अध्यक्ष तथा आदर्श पत्रकार संघाचे राज्याध्यक्ष महेश कुलकर्णी यांनी केली आहे

## पीएम अवार्डकरिता जिवती तालुक्याची प्राथमिक निवड;आकांक्षित तालुका कार्यक्रम

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

देशातील सर्वात मागासलेल्या भागातील नागरिकांचे जीवनमान सुधारणे हा आकांक्षित तालुका कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे. या कार्यक्रमांतर्गत एकूण पाच थीम व नऊ सेक्टर दिले आहेत. या नऊ सेक्टरमध्ये जिवती तालुक्याची उत्कृष्ट कामगिरी होत असल्याने आकांक्षित तालुका कॅटेगिरीमध्ये पीएम अवार्ड करिता जिवती तालुक्याची प्राथमिक निवड करण्यात आली आहे.

आकांक्षित तालुका कार्यक्रमांतर्गत आरोग्य, पोषण, शिक्षण, स्वच्छता, कृषी आणि संबंधित सेवा, पेयजल आणि स्वच्छता, आर्थिक समावेशन, मूलभूत पायाभूत सुविधा आणि सामाजिक विकास आदींचा समावेश आहे. भारत सरकारने २०२४ च्या सार्वजनिक प्रशासनातील उत्कृष्टतेसाठी पंतप्रधान पुरस्कार योजनेला मान्यता दिली आहे. सार्वजनिक प्रशासनातील उत्कृष्टतेसाठी पंतप्रधान पुरस्कारांची रचना देशभरातील नागरी सेवकांनी केलेल्या अनुकरणीय कार्याची दखल घेण्यासाठी, ओळखण्यासाठी आणि त्यांना बक्षीस देण्यासाठी करण्यात आली आहे. या अनुषंगाने प्राधान्य क्षेत्रातील कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यांचा समग्र विकास या श्रेणीअंतर्गत पाच पुरस्कार प्रदान केले जातील. आकांक्षित तालुका कार्यक्रम या श्रेणीअंतर्गत पाच पुरस्कार तर केंद्रीय मंत्रालये/विभाग, राज्ये, जिल्हे यांच्यासाठी नवोपक्रम या श्रेणीअंतर्गत सहा पुरस्कार प्रदान केले जातील.२० जानेवारी २०२५ रोजी पंतप्रधान पुरस्कार पोर्टल सुरू करण्यात आले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077